स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावकक्र. : व.वि.श.म./**
**दिनांक :** १५/०७/२०२५

## सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धेचा शुभारंभ सोहळा संपन्न

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद कार्यालय पालघर व वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय शालेय व महाविद्यालयीन सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेला' आज दि.१५ जुलै २०२५ रोजी म्हाडा मैदान, अग्निशमन केंद्रासमोर, बोळींज, विरार पश्चिम येथे सुरुवात झाली. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मा.खासदार डॉ.हेमंत सवरा, मा.आमदार श्रीम.स्नेहा दुबे-पंडित, मा.प्रथम महापौर श्री.राजीव पाटील, मा.माजी उप-महापौर श्री.सगीर डांगे, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, मा.उप-आयुक्त (क्रीडा) श्री.दिपक झिंजाड, मा.सहाय्यक आयुक्त श्री.व्हिक्टर डिसोजा, भाजपा जिल्हाध्यक्ष मा.श्रीम.प्रज्ञा पाटील, पालघर जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.सुहास व्हनमाने, जिल्हा क्रीडा सल्लागार श्री.गोविंद शिंदे, क्रीडा स्पर्धा प्रमुख श्री.योगेश चौधरी, प्राचार्या श्रीम.मुग्धा लेले, शालेय व महाविद्यालयीन क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, खेळाडू विद्यार्थी, विविध पदाधिकारी, पत्रकार, मान्यवर नागरिक, महानगरपालिकेचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत दरवर्षी सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा या स्पर्धा आयोजनाचे १३ वे वर्ष आहे. यावर्षी या स्पर्धेमध्ये महानगरपलिका क्षेत्रातील एकूण ७३ फुटबॉल संघांनी भाग घेतला असून ८०० हून अधिक खेळाडूंचा यात समावेश आहे. सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धा दि. १५ जुलै २०२५ ते दि. १९ जुलै २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे. मा.आमदार श्रीम.स्नेहा दुबे-पंडित यांनी उद्घाटनाच्या सामन्यावेळी नाणेफेक करून व मा.खासदार डॉ.हेमंत सवरा यांनी फुटबॉलला किक मारून स्पर्धेची सुरुवात केली.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून महानगरपालिकेने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करून महापालिका क्षेत्रातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे. याचबरोबर महानगरपालिका क्षेत्रात खेळांसाठी आरक्षित असलेल्या मैदानांचा, जागांचा वापर हा फक्त खेळांसाठीच करणे बाबत महानगरपालिकेने विशेष लक्ष देण्याची सूचना मा.प्रथम महापौर श्री.राजीव पाटील यांनी यावेळी बोलताना केली.

यावेळी मा.आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी उपस्थित खेळाडूंना विशेष प्रोत्साहन देत त्यांना खेळण्याच्या शुभेच्छा देत सांगितले कि, स्पर्धेत जिंकणेच महत्वाचे नसून, स्पर्धेत खेळणे त्यापेक्षाही महत्वाचे आहे. महापालिका क्षेत्रातील खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे कर्तव्य महानगरपालिका, लोकप्रतिनिधींचे असून येणाऱ्या दीड ते दोन वर्षात या फुटबॉल स्पर्धेसाठी फुटबॉल स्टेडीयम उभारण्याची जबाबदारी महानगरपालिका, लोकप्रतिनिधींची राहील.

फुटबॉल व पाऊस यांचे नाते काही वेगळेच आहे. या स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू व येथील वातावरण पाहून मला माझ्या शालेय जीवनाची आठवण झाल्याचे मा.खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी सांगितले. या फुटबॉल स्पर्धेत मोठ्या संख्येने म्हणजेच एकूण ७३ फुटबॉल संघांनी भाग घेतल्याबद्दल आश्चर्य वाटत असून वसई विरार शहर महानगरपालिका विविध खेळांना व खेळाडूंना ज्याप्रमाणे प्रोत्साहन देत आहे ते खूपच वाखाणण्यासारखे आहे. अशा प्रकारच्या खेळांमध्ये खेळाडूंना दुखापत होण्याची शक्यता लक्षात घेता महानगरपालिकेने दहीहंडी विमा योजनेप्रमाणेच या क्रीडा स्पर्धांच्या कालावधीसाठी खेळाडूंना विमा, मेडिक्लेम इ.सुविधा देण्याचे प्रयोजन करण्याचे मा.खासदार महोदयांनी सांगितले.

क्रीडा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका